■ RNI NO. MAHMAR/25/A3029

■ लातूर

■ वर्ष : ७ वे, अंक नं. : २५

■ दि. १४ मे २०२६, वार : गुरूवार

■ पाने : ४, किंमत : स्वागत  मूल्य २ रू.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## १४ मेपासून नव्या राजकीय प्रवासाला सुरुवात!

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते आणि विधान परिषदेचे आमदार अमोल मिटकरी यांचा आम दारकीचा कार्यकाळ बुधवार, १३ मे रोजी संपुष्टात आला आहे. या पार्श्वभूमीवर मिटकरी यांनी अत्यंत भावूक पोस्ट शेअर करत, '१४ मेपासून एका नव्या राजकीय प्रवासाला सुरुवात करणार' असल्याचे म्हटले आहे. आमदारकीच्या शेवटच्या दिवशी त्यांनी देवगिरी बंगल्यावर जाऊन सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. आपल्या भावना व्यक्त करताना मिटकरी म्हणाले की, ''आजचा दिवस हा संघर्ष, वादळे आणि अनेक शिकवणींनी भरलेल्या एका मोठ्या राजकीय टप्प्याचा समारोप आहे. गेल्या सहा वर्षांत अनेक कठीण प्रसंगांचा सामना केला. टीका झाली, संघर्ष करावा लागला आणि अनेकदा एकटेपणाही वाट्याला आला; मात्र महाराष्ट्रातील जनतेचा विश्वास हेच माझे बळ ठरले.'' आपल्या राजकीय प्रवासात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या संधीचा उल्लेख करताना मि टकरी भावूक झाले. ''दादांनी दिलेल्या संधीमुळेच मला राज्याच्या प्रश्नांवर काम करण्याची ताकद मिळाली. आज दादा आपल्यात नाहीत, हे कटू वास्तव पचवणे कठीण आहे. त्यांची अनुपस्थिती ही माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी पोकळी आहे,'' अशा शब्दांत त्यांनी अजित पवारांविषयीच्या आठवणींना उजाळा दिला. दुसरीकडे, आगामी विधान परिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून अमोल मिटकरी यांना पुन्हा संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, पक्षाने झिशान सिद्दीकी यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. त्यामुळे मिटकरी यांची पुढील भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, ''माझा संघर्ष अजून संपलेला नाही. उद्यापासून सुरू होणारा प्रवास अधिक संयमी, प्रगल्भ आणि महाराष्ट्राच्या मातीशी घट्ट नाते सांगणारा असेल,'' असे म्हणत मिटकरी यांनी नव्या इनिंगचे सूतोवाच केले आहे.

## पुण्यातील प्रादेशिक मनोरुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णाची गळफास घेऊन आत्महत्या

**पुणे/प्रतिनिधी :** येथील मनोरुग्णालयात उपचार घेत असलेल्या एका तरुणानं गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सनी सोनवणे (वय २९ वर्ष) असं मृत तरुणाचं नाव आहे. सनी हा मूळचा बारामती येथील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. पुण्यातील प्रादेशिक मनोरुग्णालयाचे अधीक्षक डॉ. श्रीनिवास कोलोड यांनी दिलेल्या माहितीनुसार, सनी याला मागील ४ वर्षांपासून डिप्रेशन आणि हायपर सायकोसिसचा त्रास होता. तो अधूनमधून कुटुंबीयांना 'मी आत्म हत्या करेन' असं सांगत असे. घरात असताना मिशी वाढवण्यासाठी त्यानं केमिकलचा वापर केला होता, मात्र त्यामुळे मिशीचे केस गळून पडल्यानं तो अधिक नैराश्यात गेला होता. यानंतर त्याला काल येरवडा येथील प्रादेशिक मनोरुग्णालयात दाखल करण्यात आलं. मंगळवारी (१२ मे) सायंकाळी सुमारे ४ वाजेच्या सुमारास रुग्णालयातील कर्मचारी चहा-नाश्ता देण्यासाठी गेले असता, सनीनं खिडकीला पायजमा बांधून गळफास घेतल्याचं त्यांच्या निदर्शनास आलं. त्यानंतर तातडीने पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह ससून सर्वोपचार रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला. शवविच्छेदनानंतर मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला. घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आधुनिकीकरणाला केंद्र सरकारची मंजुरी

नवी दिल्ली, दि. १३ : नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अद्ययावतीकरण आणि आधुनिकीकरणाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर राबवण्यास मंजुरी दिली आहे. या महत्वाच्या निर्णयानुसार, भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या  मिहान इंडिया लिमिटेडला दिलेल्या जमिनीची भाडेपट्ट्याची मुदत ६ ऑगस्ट २०३९ नंतरही वाढवण्यात आली आहे. या मुदतवाढीमुळे आता सवलतदार असलेल्या जीएमआर नागपूर इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेडला (जीएनआयएएल) व्यावसायिक कामकाज सुरू झाल्यापासून पुढील ३० वर्षांच्या कालावधीसाठी विमानतळाचे संचालन आणि विकास करणे शक्य होणार आहे. 'मल्टी-मोडल इंटरनॅशनल कार्गो हब अँड एअरपोर्ट ॲट नागपूर' (मिहान) प्रकल्पांतर्गत या विमानतळाला प्रादेशिक विमान वाहतूक केंद्र बनवण्याच्या दिशेने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. यापूर्वी २००९ मध्ये विमानतळ मालमत्ता हस्तांतरित करण्यात आली होती, मात्र जमिनीच्या सीमांकनामुळे भाडेपट्टा करारास विलंब झाला होता. २०१६ मध्ये काढलेल्या जागतिक निविदेत जीएमआर एअरपोर्ट्स लिमिटेडने सर्वोच्च बोली लावली होती, जी नंतर १४.४९ टक्के महसूल हिश्श्यासह सुधारित करण्यात आली. २०२० मध्ये निविदा रद्द करण्यावरून उद्भवलेला न्यायालयीन वाद सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर संपुष्टात आला असून, ८ ऑक्टोबर २०२४ रोजी जीएनआयएएलसोबत नवीन सवलत करारावर स्वाक्षरी करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे नागपूर विमानतळाच्या विकासाच्या एका नवीन पर्वाला सुरुवात होणार आहे.

# मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या अर्ध्यावर

## उच्चस्तरीय बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा निर्णय

### ■ मंत्री व अधिकाऱ्यांचे विदेश दौरे रद्द ■ अत्यावश्यक सोडून विशेष विमान, हेलिकॉप्टर दौरे नको ■ बहुतेक बैठका व्हीसीद्वारे करण्याचे निर्देश ■ मंत्री व अधिकाऱ्यांनी किमान एक दिवस सार्वजनिक वाहतूक वापरण्याचे निर्देश




**मुंबई/प्रतिनिधी :** इंधन आणि परकीय चलन बचतीच्या अनुषंगाने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन उच्चस्तरीय बैठकीत विविध उपाययोजनांचा आढावा घेतला आणि त्यानुसार मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या अर्ध्यावर आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यावेळी मुख्य सचिव, पोलीस महासंचालक आणि अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या ही तत्काळ प्रभावाने अर्ध्यावर आणण्यात यावी. बाहेरच्या प्रवासात असताना ताफ्यातील वाहनांची संख्या निर्धारित संख्येपेक्षा अधिक नसेल याची जबाबदारी संबंधित पोलिस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षक यांची असेल. मंत्री-अधिकाऱ्यांनी कोणतेही विदेश दौरे करु नयेत. मंत्र्यांनी अत्यावश्यक नसेल तेव्हा शासकीय विमान, हेलिकॉप्टर यांचा वापर करु नये, त्याऐवजी नियमित विमानसेवेचा वापर करावा. मंत्री-अधिकारी यांनी आवर्जून मेट्रो आदी सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवावा. पहिल्या टप्प्यात किमान एक दिवस असा प्रयोग करावा. अधिकाऱ्यांना बैठकांना बोलावण्याऐवजी व्हीडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून बैठका घ्याव्यात. शासनात वितरित करण्यात आलेल्या वाहनांचा कोटेकोरपणे आढावा घेण्यात यावा. ऊर्जा बचतीसाठी अनावश्यक होर्डिंग्ज/फ्लेक्सवरील कारवाई वाढवण्यात याव्यात आणि तेथे डेकोरेटिव्ह लायटिंगचा वापर होणार नाही, याची काळजी घेण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत दिले आहेत.

## व्ही एस पँथर्स च्या वतीने मिसिंग लिंक चे निर्माते इंजि अनिलकुमार गायकवाड यांचा भव्य सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** येथील व्ही एस पँथर्स च्या वतीने आयोजित ७ व्या सर्वधर्मीय सामुहीक विवाह सोहळ्यात विशेष सत्कारमूर्ती म्हणून इंजि अनिलकुमार गायकवाड हे उपस्थित होते. इंजिनीयर अनिल कुमार गायकवाड हे लातूर जिल्ह्याचे भूमिपुत्र असून त्यांनी त्यांच्या कार्यामधून लातूरचे नाव जगभरात प्रसिद्ध केले आहे यासाठी व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी इंजि गायकवाड यांना शाल पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील माजी मंत्री तथा आमदार संभाजी पाटील निलंगेकर औसा तालुक्याचे लोकप्रिय आमदार अभिमन्यू पवार माजी खासदार सुनील गायकवाड माजी आमदार बब्रुवान खंदाडे, महापौर जयश्री सोनकांबळे, विरोधी पक्षनेते देविदास काळे अतिरिक्त पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, शहर पोलीस उपाधीक्षक समीरसिंह साळवे एडवोकेट विनोद मुळे एडवोकेट बळवंत जाधव एडवोकेट बी एल शिंदे सह आदीजन उपस्थित होते. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोद भाऊ खटके प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन मस्के संपर्कप्रमुख आनंद जाधव मार्गदर्शक संतोष मांदळे रवी कुरील मराठवाडा अध्यक्ष निलेश कांबळे विद्यार्थी आघाडी मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे जिल्हाध्यक्ष शरद किनीकर कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पायाळ,विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्नील कांबळे, ऑटो युनियन जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड शहराध्यक्ष असद शेख, कामगार आघाडी शहराध्यक्ष गौस शेख, जिल्हा संघटक गोविंद कांबळे, सूरज सूर्यवंशी,अतुल होळकर, मनोज गायकवाड, साईनाथ कांबळे, शाहरुख मणियार, आबासाहेब गायकवाड, धनराज सुरवसे, संजीव सुरवसे, सुनील सातपुते, महेश कांबळे, प्रदीप गायकवाड, संतोष कांबळे, नारायण चव्हाण, यासिन शेख, रमजान शेख  अजय सूर्यवंशी ॲड रमक जोगदंड, असित कांबळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते

## रिझर्व्ह बँकेकडून सर्वोदय सहकारी बँकेचा परवाना रद्द

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) मुंबईतील 'सर्वोदय सहकारी बँके'चा परवाना अखेर रद्द केला आहे. बँकेकडे असलेले अपुरे भांडवल, उत्पन्नाची घटलेली साधने आणि बँकिंग नियामक कायद्यातील तरतुदींचे पालन करण्यात आलेले अपयश यावर ठपका ठेवत आरबीआयने ही कारवाई केली आहे. या निर्णयामुळे बँकेचे सर्व बँकिंग व्यवहार बुधवारपासून तातडीने बंद झाले आहेत. रिझर्व्ह बँकेने दिलेल्या माहितीनुसार, सर्वोदय सहकारी बँकेची आर्थिक स्थिती अत्यंत खालावलेली असून भविष्यात उत्पन्नाची कोणतीही शाश्वती उरलेली नाही. बँक आपल्या ठेवीदारांची देणी पूर्णपणे भागवण्यास असमर्थ असल्याचे तपासणीत स्पष्ट झाले आहे. ''अशा स्थितीत बँकेचे कामकाज पुढे चालू ठेवणे हे ठेवीदारांच्या हितासाठी आणि सार्वजनिक सुरक्षिततेसाठी अत्यंत हानिकारक ठरेल,'' असा निष्कर्ष नोंदवत आरबीआयने परवाना रद्द केला आहे. बँकिंग व्यवहारांवर तात्काळ बंदी  परवाना रद्द झाल्यामुळे बँकेला आता नवीन ठेवी स्वीकारणे किंवा जुन्या ठेवींची परतफेड करणे यासह कोणत्याही प्रकारचे बँकिंग व्यवहार करता येणार नाहीत. बँकिंग नियमन कायद्यातील महत्त्वाच्या कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन केल्याने ही कारवाई करण्यात आली आहे.

## यंदाचे नाट्यपरिषदेचे पुरस्कार संकर्षण कऱ्हाडे, निलम शिर्के – सामंत व प्रदीप भोकरे यांना जाहीर

### जेष्ठ अभिनेते मिलिंद शिंदे यांच्या हस्ते होणार पुरस्कार वितरण



**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद लातूर महानगर शाखेची बैठक पार पडली. शाखेच्यावतीने प्रतिवर्षी रंगकर्मी पुरस्कार दिले जातात. बैठकीत यंदाच्या स्व. रंगकर्मी बंकट पुरी पुरस्कारासाठी मराठवाड्याचा उगवता तारा म्हणून व्यावसायिक रंगभूमीवर ठसा उमटवणारे अभिनेते संकर्षण कऱ्हाडे यांची, शाखेच्यावतीने राज्यात रंगमंचीय क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तीस  दिला जाणारा रंगमंचीय गौरव पुरस्कार सिने व नाट्य अभिनेत्री निलम शिर्के - सामंत यांची तर लातूरच्या प्रायोगिक रंगभूमीवर कार्यरत असणाऱ्या होतकरु रंगकर्मीला दिल्या जाणाऱ्या स्व. विजयकुमार धायगुडे रंगकर्मी पुरस्कारासाठी प्रदीप भोकरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

सदर पुरस्कारांचे वितरण जेष्ठ अभिनेते मिलिंद शिंदे व लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या शुभहस्ते दि. २० मे २०२६ रोजी सायं. ५ वाजता भालचंद्र ब्लड बँक, सभागृह येथे संपन्न करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. सदर समारंभास लातूरकर रसिकांनी आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन महानगर शाखेच्यावतीने करण्यात आले आहे.

बैठकीस अ. भा. म. नाट्यपरिषद लातूर महानगर शाखेचे अध्यक्ष ॲड. शैलेश गोजमगुंडे, कार्याध्यक्ष डॉ. दिपक वेदपाठक, उपाध्यक्षा अर्चना पोपडे, कोषाध्यक्ष अनील पुरी, सहकार्यवाह नागेश जाधव, कार्यकारिणी सदस्य रवी आघाव, रुपेश सूर्यवंशी, मुक्त पत्रकार अश्विनी धायगुडे - कोळेकर, बालरंगभूमी परिषद, लातूर शाखेचे अध्यक्ष रणजित आचार्य, वसुधा पाटील, भीम दुनगावे आदी उपस्थित होते.

# सह जिल्हा निबंधक जी. बी. सातदिवे यांनी दुय्यम निबंधक कार्यालयांकडे लक्ष घालावे

## अधिकारी व कर्मचाऱ्यांना ओळखपत्र सक्तीचे करण्याची नागरिकांची मागणी

**लातूर(दै महावृत्त न्यूज )** लातूर शहरातील दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक १ आणि २ मधील कारभाराबाबत नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत असून कार्यालयातील शिस्त, सुरक्षा आणि पारदर्शकतेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

मालमत्ता दस्त नोंदणीसाठी जिल्ह्याच्या विविध भागांतून दररोज मोठ्या प्रमाणावर नागरिक या कार्यालयांमध्ये येत असतात. मात्र, कार्यालयामध्ये अनेक अधिकारी, कर्मचारी तसेच इतर व्यक्ती कोणतेही ओळखपत्र न लावता वावरताना दिसत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. त्यामुळे नेमके कोण शासकीय कर्मचारी आणि कोण बाहेरील व्यक्ती हे ओळखणे कठीण होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.नागरिकांच्या मते, शासकीय कार्यालयात प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने स्पष्टपणे दिसेल असे आयकार्ड गळ्यात लावणे सक्तीचे केले पाहिजे. विशेषतः दस्त नोंदणीसारख्या संवेदनशील विभागात ओळख व्यवस्थेचा अभाव असल्यास पारदर्शकतेवर प्रश्न निर्माण होऊ शकतात.



कार्यालय परिसरात दलालांचा वावर वाढल्याची चर्चा देखील नागरिकांमध्ये सुरू आहे. काही वेळा दुय्यम निबंधक यांच्या खुर्चीपर्यंत मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याने सामान्य नागरिकांना कामकाजाची प्रक्रिया अधिक गोंधळाची वाटत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे कार्यालयात शिस्तबद्ध प्रवेश व्यवस्था आणि अधिकृत कर्मचाऱ्यांची स्पष्ट ओळख आवश्यक असल्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. यासंदर्भात सह जिल्हा निबंधक तथा जिल्हा मुद्रांक अधिकारी जी. बी. सातदिवे यांनी लक्ष घालावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

जी. बी. सातदिवे हे अतिशय पारदर्शक, कार्यतत्पर आणि प्रामाणिक अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांनी मुंबईसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी काम केलेला अनुभव असल्यामुळे प्रशासनात शिस्त आणि पारदर्शकता निर्माण करण्याची त्यांची प्रतिमा आहे. त्यामुळे जिल्ह्यातील तसेच लातूर शहरातील दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक १ आणि २ मधील कामकाज अधिक शिस्तबद्ध करण्यासाठी त्यांनी विशेष लक्ष घालावे, अशी नागरिकांची मागणी आहे.

नागरिकांच्या मते, अधिकारी व कर्मचाऱ्यांना आयकार्ड सक्तीचे करणे, अनधिकृत व्यक्तींवर नियंत्रण ठेवणे आणि कार्यालयातील शिस्त मजबूत करणे या उपाययोजना तातडीने राबविल्यास सामान्य नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होईल.

संपादकीय...

## लोकशाहीसमोर उभे राहिलेले मोठे प्रश्न

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून ओळखला जातो. येथे सत्ता ही जनतेच्या मतांवर ठरते आणि प्रत्येक निवडणूक ही देशाच्या राजकीय दिशेचा निर्णय घेणारी असते. परंतु गेल्या काही वर्षांत देशातील राजकारण एका अशा टप्प्यावर येऊन पोहोचले आहे की, अनेक नागरिकांच्या मनात एक प्रश्र्न निर्माण होऊ लागला आहे – भारतात सत्तांतराची शक्यता खरोखर उरली आहे का? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने राष्ट्रीय राजकारणात अत्यंत मजबूत स्थान निर्माण केले आहे. २०१४ पासून सुरू झालेला हा राजकीय प्रवास केवळ निवडणूक विजयांचा नाही, तर संपूर्ण राजकीय कथानक बदलण्याचा प्रवास ठरला. राष्ट्रवाद, मजबूत नेतृत्व, कल्याणकारी योजना आणि प्रभावी प्रचारयंत्रणा यांच्या आधारावर भाजपने स्वतःची प्रतिमा देशव्यापी शक्ती म्हणून उभी केली. आज परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की विरोधी पक्ष अस्तित्वासाठी झगडताना दिसतात. राष्ट्रीय पातळीवर सक्षम पर्याय निर्माण करण्यात विरोधक वारंवार अपयशी ठरत आहेत. एका बाजूला सत्ताधारी पक्षाकडे प्रचंड संसाधने, मजबूत संघटन आणि व्यापक माध्यम प्रभाव आहे; तर दुसऱ्या बाजूला विरोधकांमध्ये नेतृत्वाचा अभाव आणि अंतर्गत मतभेद स्पष्टपणे दिसतात. यामुळे अनेक सामान्य मतदारांच्या मनात अशी भावना निर्माण झाली आहे की, जोपर्यंत छरीशपवीर चेवळ सक्रिय राजकारणात आहेत, तोपर्यंत देशाच्या सत्तेत बदल होणे कठीण आहे. ही भावना केवळ समर्थकांमध्ये नाही, तर काही विरोधी मतदारांमध्येही दिसते. कारण निवडणूक जिंकण्याची क्षमता ही केवळ लोकप्रियतेवर नाही, तर संपूर्ण निवडणूक व्यवस्थापनावर अवलंबून असते. भारतीय राजकारणात आज व्यक्तिकेंद्री नेतृत्वाचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. अनेक निवडणुका स्थानिक उमेदवारांपेक्षा थेट पंतप्रधानांच्या चेहऱ्यावर लढवल्या जातात. त्यामुळे संसदीय लोकशाहीचे स्वरूप हळूहळू अध्यक्षीय शैलीकडे झुकत असल्याची टीका काही राजकीय विश्लेषक करतात. यासोबतच निवडणूक प्रक्रियेबाबत निर्माण होणाऱ्या शंका देखील चर्चेचा विषय ठरत आहेत. मतदार याद्यांमधील बदल, निवडणूक आयोगाच्या निर्णयांवरील प्रश्न, ईव्हीएम संदर्भातील आरोप आणि तपास यंत्रणांच्या वापराबाबत विरोधकांकडून सातत्याने टीका होत असते. हे आरोप न्यायालयीन स्तरावर सिद्ध झालेले नसले, तरी लोकशाहीमध्ये केवळ निष्पक्षता पुरेशी नसते; निष्पक्षता दिसली देखील पाहिजे. मुख्य निवडणूक आयुक्त Gyanesh Kumar यांच्या कार्यपद्धतीबाबतही काही विरोधी पक्षांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. मतदार यादी पुनरावलोकन, विशेष तपास मोहीमा आणि प्रशासकीय निर्णय यांचा परिणाम निवडणुकांवर होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जाते. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर चर्चा अधिक तीव्र झाली आहे. लोकशाहीतील सर्वात मोठी ताकद म्हणजे संस्थांची विश्वासार्हता. जर जनतेला न्यायपालिका, निवडणूक आयोग, माध्यमे आणि संसदीय व्यवस्था यांच्यावर विश्र्वास राहिला नाही, तर लोकशाहीची मुळे कमकुवत होऊ लागतात. आज भारतात हाच चिंतेचा मुद्दा अनेक बुद्धिजीवी आणि सामाजिक कार्यकर्ते मांडताना दिसतात. माध्यमांची भूमिकाही या परिस्थितीत अत्यंत महत्त्वाची ठरते. एकेकाळी सरकारवर कठोर प्रश्र्न विचारणारी माध्यमे आज मोठ्या प्रमाणावर सत्ताकेंद्रित झाली आहेत, अशी टीका वारंवार होते. विरोधी मतांना कमी जागा मिळते आणि राजकीय चर्चेचे स्वरूप प्रचारप्रधान होत चालल्याचा आरोप केला जातो. सोशल मीडियाच्या युगात राजकारण अधिक आक्रमक झाले आहे. माहितीपेक्षा प्रतिमा आणि भावनिक संदेश यांना जास्त महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे मतदारांच्या भावनांवर प्रभाव टाकणे अधिक सोपे झाले आहे. संघटित डिजिटल प्रचार हा निवडणुकीतील निर्णायक घटक बनत चालला आहे. तथापि, भारतीय मतदार पूर्णपणे एकाच दिशेने विचार करतात असे नाही. अनेक राज्यांमध्ये प्रादेशिक पक्ष अजूनही मजबूत आहेत. काही ठिकाणी भाजपला पराभव स्वीकारावा लागला आहे. याचा अर्थ लोकशाहीतील स्पर्धा पूर्णपणे संपलेली नाही. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतही सत्ताधारी पक्षाला अपेक्षित पूर्ण वर्चस्व मिळाले नाही. जनतेने सरकारला पुन्हा संधी दिली, पण त्याचवेळी मर्यादाही दाखवून दिल्या. त्यामुळे मतदार अजूनही सत्तेला प्रश्न विचारण्याची क्षमता ठेवून आहेत, हे स्पष्ट होते. लोकशाहीमध्ये कोणताही नेता कायमस्वरूपी अजेय नसतो. इतिहासात अनेक शक्तिशाली सरकारे जनमतामुळे बदलली आहेत. खपवळीर ऋ्रपवहळ यांच्या काळातही काँग्रेस अजेय वाटत होती, पण जनतेने १९७७ मध्ये सत्तांतर घडवले. त्यामुळे लोकशाहीमध्ये अंतिम निर्णय हा नेहमी जनतेचाच असतो. आजच्या परिस्थितीत विरोधी पक्षांसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे विश्वासार्ह पर्याय निर्माण करणे. केवळ सरकारविरोधी भूमिका घेऊन निवडणुका जिंकता येत नाहीत. जनतेला स्पष्ट नेतृत्व, ठोस धोरणे आणि स्थिर पर्याय हवा असतो. देशातील तरुण मतदारांची भूमिका भविष्यात निर्णायक ठरणार आहे. रोजगार, शिक्षण, अर्थव्यवस्था आणि सामाजिक सलोखा या मुद्द्यांवर त्यांचा कल बदलू शकतो. त्यामुळे भविष्यातील राजकारण केवळ व्यक्तिमत्त्वाभोवती फिरणार नाही, तर प्रत्यक्ष कामगिरीवरही अवलंबून राहील. आज अनेकांना असे वाटत असले तरी की नरेंद्र मोदी यांच्याशिवाय दुसरा पर्याय नाही, लोकशाहीमध्ये राजकीय वास्तव सतत बदलत असते. जनमत हे कायम स्थिर राहत नाही. आर्थिक परिस्थिती, सामाजिक प्रश्न आणि नेतृत्वातील बदल यामुळे राजकीय समीकरणे वेगाने बदलू शकतात. भारतीय संविधानाने कोणत्याही एका व्यक्तीला किंवा पक्षाला कायमस्वरूपी सत्ता दिलेली नाही. सत्ता ही जनतेच्या विश्र्वासावर टिकते आणि तो विश्वास टिकवण्यासाठी सतत उत्तरदायित्व आवश्यक असते. म्हणूनच मजबूत लोकशाहीसाठी मजबूत विरोधकही तितकेच आवश्यक असतात. जर देशात स्पर्धात्मक राजकारण कमी झाले, तर लोकशाहीचे संतुलन बिघडू शकते. सत्ताधाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र माध्यमे, सक्रिय न्यायव्यवस्था आणि प्रभावी विरोधक आवश्यक असतात. अन्यथा लोकशाही हळूहळू केवळ निवडणुकीपुरती मर्यादित राहण्याचा धोका असतो. आज भारत एका महत्त्वाच्या वळणावर उभा आहे. एका बाजूला मजबूत नेतृत्व आणि स्थिर सरकारची अपेक्षा आहे, तर दुसऱ्या बाजूला संस्थांची स्वायत्तता आणि लोकशाहीचे संतुलन जपण्याचे आव्हान आहे. या दोन्ही गोष्टींचा समतोल राखणे हेच भविष्यातील भारतासाठी सर्वात मोठे काम असेल. लोकशाहीची खरी ताकद एका नेत्यात नसते, तर जनतेच्या जागरूकतेत असते. जनता प्रश्न विचारत राहिली, संस्था स्वतंत्र राहिल्या आणि निवडणुका पारदर्शक राहिल्या, तर भारतीय लोकशाही भविष्यातही मजबूत राहील. पण जर भीती, अविश्वास आणि एकाधिकारशाहीची भावना वाढू लागली, तर तो देशासाठी गंभीर इशारा ठरेल.

# तुर्भे येथे श्रामनेर– बौद्धाचार्य धम्म प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ



**नवी मुंबई / के. एच. हनवते :–** पंचशील बुद्ध विहार – भैय्यासाहेब आंबेडकर भवन तुर्भे नवी मुंबई येथे द बुद्धीष्ट सोसायटी ऑफ इंडिया कायदेशीर सल्लागार मान. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिन ''स्वाभिमानी संकल्प डे'' चे अवचिते साधून दिनांक १० मे २०२६ रोजी श्रामनेर – बौद्धाचार्य धम्म प्रशिक्षण शिबिरास संघनायक पूज्य भंते : संघपाल जी महाथेरो, पूज्य भंते धम्मपालजी महाथेरो, पूर्वाश्रमीचे प्रकाश माने भंते कौंडीने, तसेच या कार्यक्रमाचे प्रमुख मान्यवर व मार्गदर्शक : अशोक केदारे गुरुजी (केंद्रीय कार्यालयीन सचिव महाराष्ट्र राज्य), तसेच विजय कांबळे गुरुजी (उपाध्यक्ष संस्कार महाराष्ट्र राज्य) यांच्या उपस्थितीत प्रारंभ झाला, या शिबिरासाठी आपल्या कुटुंबातील सदस्याला या १० दिवसांच्या कडक शिस्तीत आणि धम्म संस्कारात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणाऱ्या सर्व कुटुंबांच्या धम्मविचारांचे जाहीर कौतुक करावे तेवढे कमीच आहे, अशा शब्दात मनोगत व्यक्त करून सर्व उपस्थितांचे मनोबल वाढवले हे नवोदित बौध्दाचार्य आणि सामणेर शिबिर पूर्ण करून बाहेर पडताना प्रज्ञा, शील आणि करुणेचा धम्म संदेश सोबत घेऊन जातील आणि भविष्यात स्वतःच्या घराचे व समाजाचे नाव नक्कीच उज्ज्वल करतील..! असा आम्हाला ठाम विश्वास आहे अशी मंगल कामना शिबिरार्थी यांना मंगलमय शुभेच्छा दिल्या, पहिल्या दिवसापासून ते सांगता समारोप दिवसापर्यंत जे जे हात या धम्मकार्यासाठी झटणार आहेत, त्या सर्वांचे मनापासून धन्यवाद व त्यांच्या प्रति मंगल मैत्री कामना पुढील १० दिवस आपले हे कार्य अत्यंत उत्साहात, आनंदाने आणि शिस्तीने पार पडो, याच सदिच्छा ! आपले हे धम्मकार्य असेच अखंड सुरू राहो, हीच तथागतांच्या चरणी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : विजय झनके गुरुजी, आयु. संजय झनके गुरुजी (सरचिटणीस), आयु. प्रकाश माने (कोषाध्यक्ष), प्रकाश भालेराव गुरुजी (उपाध्यक्ष संस्कार), नवी मुंबई महिला जिल्हाध्यक्ष : शोभाताई कांबळे इत्यादी पदाधिकारी यांनी आपल्या शिबिरार्थींना मंगलमय शुभेच्छा देऊन सर्वांच्या प्रति मंगल मैत्री केली. हे श्रामनेरी – बौद्धाचार्य धम्म प्रशिक्षण शिबिर १० मे २०२६ ते १९ मे २०२६ पर्यंत चालणार आहे, ज्यांना कुणाला आपल्या विभागात संघाला भोजनदान/ फलहार वैगरे करायचे असेल त्यांनी विजय झनके गुरुजी, आणि संजय झनके गुरुजी यांच्याशी संपर्क करावा.

## सोने–चांदी आणखी महागणार! केंद्र सरकारने आयात शुल्क ६ टक्क्यांवरून थेट १५ टक्क्यांवर नेले

मुंबई : देशातून परदेशात जाणारा पैसा कमी करण्यासाठी आणि रुपयाची घसरण रोखण्यासाठी केंद्र सरकारने सोने आणि चांदीवरील आयात शुल्कात मोठी वाढ केलीय. सरकारने सोने आणि चांदीवरील आयात शुल्क ६ टक्क्यांवरून थेट १५ टक्क्यांपर्यंत वाढवलं असून, हा निर्णय मंगळवार मध्यरात्रीपासून लागू करण्यात आलाय. नव्या रचनेनुसार सरकारने १० टक्के बेसिक कस्टम ड्युटी आणि ५ टक्के अघ्ऊ्रब (ॲग्रीकलचर इन्फ्रास्ट्रक्टर अँड डेव्हलपमेंट सेस) लागू केला आहे. त्यामुळे परदेशातून सोने–चांदी आणणे आता अधिक महाग होणार आहे, याचा थेट परिणाम देशातील सराफा बाजारावर होण्याची शक्यता आहे. सोने खरेदीसाठी ग्राहकांना अधिक पैसे मोजावे लागतील.

# सोमनाथ पर्व: भारतीय संस्कृतीतील श्रद्धा, साधना आणि आध्यात्मिकतेचे प्रतीक



भारतीय संस्कृती ही सण, उत्सव आणि धार्मिक परंपरांनी समृद्ध अशी संस्कृती आहे. भारतातील प्रत्येक सणामागे एखादी आध्यात्मिक भावना, नैतिक संदेश किंवा सामाजिक मूल्य दडलेले असते.

१७८३ मध्ये इंदूरच्या राणी अहिल्यादेवी होळकर यांनी सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराचा निर्णय घेतला. शेकडो वर्षे भग्नावस्थेत असलेले मंदिर त्यांनी स्वखर्चाने पुन्हा उभे केले. या मंदिराचा इतिहास आक्रमण, पुनर्बांधणी, आत्मसन्मान आणि राष्ट्रीय पुनर्जागरण यांचा मेळ आहे. 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' (२०२६) मधील या पर्वामुळे सोमनाथच्या इतिहासाला नवा उजाळा मिळाला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सोमनाथच्या विकासाला गती मिळाली असून, हे स्थान केवळ एक मंदिर नसून भारताच्या सामर्थ्याचे केंद्र बनले आहे.

आपल्या संस्कृतीतील विविध पर्वांपैकी सोमनाथ पर्व हे भगवान शंकराच्या उपासनेशी संबंधित एक महत्त्वपूर्ण आणि पवित्र पर्व मानले जाते. ''सोम'' म्हणजे चंद्र आणि ''नाथ'' म्हणजे स्वामी, म्हणजेच चंद्राचे स्वामी असा त्याचा अर्थ होतो.

सोमनाथ पर्व हे श्रद्धा, भक्ती, संयम आणि अध्यात्म यांचा संगम मानले जाते. या पर्वाद्वारे भक्त भगवान शंकराची आराधना करून जीवनातील दुःख, संकटे आणि नकारात्मकता दूर करण्याची प्रार्थना करतात. या दिवशी मंदिरांमध्ये विशेष पूजा–अर्चा, अभिषेक, भजन, कीर्तन आणि रुद्रपाठाचे आयोजन केले जाते.

सोमनाथ पर्व हे आपल्याला संयम आणि साधनेचे महत्त्व शिकवते. उपवास हा केवळ अन्नत्याग नसून मन आणि शरीर शुद्ध ठेवण्याचा मार्ग आहे. उपवासामुळे मनावर नियंत्रण ठेवण्याची क्षमता वाढते. राग, मत्सर, लोभ आणि अहंकार यांसारख्या नकारात्मक भावनांवर विजय मिळवण्याची प्रेरणा मिळते. म्हणूनच भारतीय संस्कृतीत उपवासाला आध्यात्मिक साधनेचे महत्व दिले गेले आहे.

या पर्वाच्या निमित्ताने अनेक ठिकाणी महाप्रसादाचे आयोजनही केले जाते. समाजातील सर्व स्तरातील लोक या धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होतात. त्यामुळे समाजात एकात्मता आणि बंधुभाव वाढण्यास मदत होते. सोमनाथ पर्व हे निसर्गाशी असलेल्या भारतीय संस्कृतीच्या नात्याचीही आठवण करून देते.

शिवपूजेमध्ये वापरली जाणारी बेलपत्रे, पाणी, दूध, धतूरा आणि फुले ही निसर्गातीलच देणगी आहेत. यामुळे मानव आणि निसर्ग यांच्यातील परस्पर संबंध अधोरेखित होतो.

आजचे जीवन अत्यंत धावपळीचे आणि तणावपूर्ण झाले आहे. स्पर्धा, कामाचा ताण आणि मानसिक दबाव यांमुळे अनेक लोक चिंताग्रस्त झालेले दिसतात. अशा परिस्थितीत धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरा मनाला शांतता देण्याचे कार्य करतात. सोमनाथ पर्वासारखे सण माणसाला आत्मचिंतनाची संधी देतात.

सोमनाथ पर्वाचे सामाजिक महत्वही तितकेच मोठे आहे. या पर्वाच्या निमित्ताने लोक एकत्र येतात, एकमेकांना शुभेच्छा देतात आणि सामाजिक ऐक्य दृढ करतात. भारतीय संस्कृतीत 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना महत्त्वाची मानली जाते. म्हणजेच संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे. धार्मिक सण आणि पर्व ही भावना अधिक दृढ करतात. समाजात प्रेम, सहकार्य आणि परस्पर आदर वाढवण्याचे कार्य हे पर्व करतात.

भारतीय संस्कृतीतील सण–उत्सव हे केवळ मनोरंजनासाठी नसून संस्कारांचे माध्यम आहेत. लहान मुलांना धार्मिक कथा, परंपरा आणि संस्कृतीची ओळख अशा सणांमधूनच होते. भक्ती, प्रामाणिकपणा, संयम आणि चांगले आचरण यांचे महत्त्व यावर चर्चा होते, त्यामुळे पुढील पिढीपर्यंत सांस्कृतिक वारसा पोहोचण्यास मदत होते.

सोमनाथ मंदिरालाही भारतीय इतिहासात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. गुजरातमधील प्रभास पाटण येथे असलेले सोमनाथ मंदिर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पहिले ज्योतिर्लिंग मानले जाते. या मंदिराचा इतिहास अत्यंत गौरवशाली आहे. अनेक आक्रमणांमध्ये हे मंदिर उद्ध्वस्त झाले, परंतु प्रत्येक वेळी ते पुन्हा उभे राहिले. यामुळे भारतीय संस्कृतीची जिद्द, श्रद्धा आणि पुनरुत्थानाची शक्ती दिसून येते. सोमनाथ मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून भारतीय अस्मिता आणि सांस्कृतिक अभिमानाचे प्रतीक आहे.

सोमनाथ पर्व आपल्याला जीवनातील अडचणींवर मात करण्याची प्रेरणा देते. जीवनात कितीही संकटे आली तरी धैर्य, संयम आणि श्रद्धेच्या बळावर त्यांचा सामना करता येतो, हा संदेश या पर्वातून मिळतो. भगवान शंकराचा साधेपणा, त्याग आणि करुणा हे गुण प्रत्येकाने आत्मसात करण्यासारखे आहेत.

आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात अनेक लोक आधुनिकतेकडे झुकत असले तरी भारतीय संस्कृतीतील आध्यात्मिक मूल्यांचे महत्त्व अजूनही कायम आहे. आधुनिक जीवनशैलीसोबतच संस्कृती आणि परंपरांचे जतन करणे आवश्यक आहे. कारण संस्कृती ही समाजाची ओळख असते. आपल्या परंपरा जपल्यामुळे समाजात नैतिक मूल्ये टिकून राहतात.

सोमनाथ पर्व हे श्रद्धा, भक्ती, आत्मशुद्धी आणि सामाजिक ऐक्य यांचे प्रतीक आहे. हे पर्व माणसाला सकारात्मकतेचा मार्ग दाखवते. आपल्या मनातील वाईट विचार दूर करून सत्य, प्रेम आणि शांततेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देते. भारतीय संस्कृतीतील ही परंपरा आपल्या जीवनाला आध्यात्मिक समृद्धी प्रदान करणारी आहे.



अशा पवित्र पर्वांच्या माध्यमातून समाजात चांगले संस्कार निर्माण होतात, मानसिक शांतता लाभते आणि सांस्कृतिक वारसा जपला जातो. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या परंपरा आणि संस्कृतीचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. सोमनाथ पर्व हे केवळ धार्मिक उत्सव नसून मानवी जीवन अधिक सुंदर, शांत आणि समृद्ध बनवणारे प्रेरणादायी पर्व आहे.

**माधुरी मिसाळ,**
**राज्यमंत्री सामाजिक न्याय विभाग**

# सत्य आणि प्रामाणिकपणाने आत्म्याचा सर्वोच्च सन्मान सदैव प्राप्त होतो : बिस्वा रंजन

एका छोट्याशा गावात श्याम कुमार नावाचा एक साधा, शांत आणि मनाने अत्यंत उदार युवक राहत होता. त्याचे कुटुंब अत्यंत गरीब होते. वडील शेतात मजुरी करून घर चालवत होते, तर आई लोकांच्या घरी काम करून संसाराचा गाडा ओढत होती. अनेक वेळा घरात दोन वेळचे अन्नसुद्धा मिळणे कठीण होत असे. पण एवढ्या कठीण परिस्थितीतही श्यामच्या चेहऱ्यावर कधीही निराशेची सावली दिसत नव्हती. त्याच्या डोळ्यांत मोठी स्वप्ने होती आणि हृदयात मानवतेची ज्योत पेटलेली होती. तो नेहमी म्हणायचा, ''माणसाची खरी ओळख त्याच्या संपत्तीत नसते, तर त्याच्या चांगल्या कर्मांत असते.'' गावातील गरीब, वृद्ध आणि गरजू लोकांना मदत करण्यात त्याला खूप आनंद मिळायचा. स्वतःच्या दुःखाकडे दुर्लक्ष करून तो दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू आणण्याचा प्रयत्न करत असे. त्याच्या या स्वभावामुळे काही लोक त्याचे कौतुक करत, तर काही त्याला मूर्ख समजून हसत असत. पण श्यामला त्याची पर्वा नव्हती, कारण त्याला माहित होते की खरे समाधान हे दुसऱ्यांच्या भल्यातच असते.

श्याम लहानपणापासूनच अत्यंत प्रामाणिक आणि मेहनती होता. गावातील एखादा वृद्ध रस्ता ओलांडताना दिसला की तो धावत जाऊन मदत करत असे. एखाद्या गरीब मुलाकडे पुस्तके नसली तर स्वतःची जुनी पुस्तके त्याला देत असे. अनेकदा लोक त्याला म्हणायचे, ''इतका चांगला बनून तुला काय मिळणार?'' तेव्हा श्याम शांतपणे हसत उत्तर द्यायचा, ''जर माझ्यामुळे कोणाच्या चेहऱ्यावर हसू आले, तर तेच माझ्या जीवनाचे सर्वात मोठे यश आहे.'' त्याच्या या विचारांमध्ये एक अद्भुत पवित्रता होती. जगात जिथे लोक स्वार्थासाठी एकमेकांना विसरतात, तिथे श्याम स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून दुसऱ्यांच्या मदतीला धावून जात होता. त्याची आई अनेकदा त्याच्या डोक्यावर हात ठेवून म्हणायची, ''बाळा, माणसाने नेहमी सत्याच्या आणि प्रामाणिकपणाच्या मार्गावर चालले पाहिजे. देव उशिरा का होईना, पण चांगल्या माणसाला योग्य फळ नक्की देतो.'' आईचे हे शब्द श्यामच्या मनात खोलवर कोरले गेले होते आणि त्याच शब्दांनी त्याला प्रत्येक संकटात उभे राहण्याची शक्ती दिली.

काळ पुढे सरकत गेला. गरीबी, उपासमार आणि संघर्ष यांच्यामध्येही श्यामने आपले शिक्षण थांबवले नाही. दिवसभर मजुरी करून तो रात्री उशिरापर्यंत अभ्यास करत असे. थकव्याने कधी त्याच्या डोळ्यांत अश्रू यायचे, पण त्याने कधी हार मानली नाही. गावातील काही लोक त्याला टोमणे मारत म्हणायचे, ''गरीब माणसाची स्वप्ने कधी पूर्ण होत नाहीत.'' या शब्दांनी त्याचे मन दुखावले जायचे, पण त्याने आपला मार्ग बदलला नाही. त्याला विश्वास होता की संघर्षाशिवाय यश मिळत नाही. त्याने प्रत्येक अडचणीला धैर्याने सामोरे जाण्याचा निर्णय घेतला होता. त्याच्या मनात एकच विचार होता ''जीवनात कितीही अंधार असला, तरी सत्य आणि मेहनतीचा दिवा कधी विझू देऊ नये.'' त्याच्या या जिद्दीमुळे तो हळूहळू गावातील तरुणांसाठी प्रेरणा बनू लागला. लोकांना त्याच्या डोळ्यांत आशेचा प्रकाश दिसू लागला. श्यामच्या संघर्षाने अनेकांना हे शिकवले की परिस्थिती गरीब असली तरी विचार आणि स्वप्ने मोठी असू शकतात.

एक दिवस गावावर भयंकर पूर आला. चारही बाजूंनी पाणीच पाणी झाले होते. लोक स्वतःचा जीव वाचवण्यासाठी धावपळ करत होते. अनेकांनी स्वतःला घरात बंद करून घेतले, पण श्याम मात्र दुसऱ्यांच्या मदतीसाठी बाहेर पडला. त्याने स्वतःच्या जीवाची पर्वा न करता अनेक मुलांना, महिलांना आणि वृद्धांना सुरक्षित ठिकाणी पोहोचवले. रात्रभर तो पावसात भिजत लोकांना वाचवत राहिला. त्याचे शरीर थकले होते, कपडे पूर्ण भिजले होते, पण त्याच्या मनात फक्त मानवतेची सेवा करण्याची भावना होती. त्या संकटाच्या काळात गावकऱ्यांनी प्रथमच ओळखले की ज्याची ते थट्टा करत होते, तोच खऱ्या अर्थाने माणुसकीचा देवदूत आहे. पूर ओसरल्यानंतर सरकारी अधिकारी गावात मदतीसाठी आले. जेव्हा त्यांना श्यामच्या धैर्य आणि सेवाभावाबद्दल समजले, तेव्हा त्यांनी संपूर्ण गावासमोर त्याचा सन्मान करण्याचा निर्णय घेतला. ज्यांनी कधी त्याचा अपमान केला होता, तेच लोक आज त्याच्या गौरवासाठी टाळ्या वाजवत होते. पण श्यामच्या चेहऱ्यावर गर्वाचा लवलेशही नव्हता. तो फक्त एवढेच म्हणाला, ''मी जे केले, ते माझे कर्तव्य होते. खरा सन्मान लोकांच्या टाळ्यांत नसतो, तर स्वतःच्या आत्म्याच्या शांततेत असतो.''

त्या दिवसानंतर श्याम संपूर्ण गावासाठी प्रेरणास्त्रोत बनला. युवक त्याच्याकडे सल्ला घेण्यासाठी येऊ लागले. तो नेहमी सांगायचा, ''जीवनात चांगले कर्म करणे कधीही थांबवू नका. जग तुमची कदर करो अथवा न करो, पण तुमची आत्मा प्रत्येक चांगल्या कर्मानंतर तुम्हाला आशीर्वाद देते.'' त्याच्या शब्दांत एवढी ताकद होती की लोकांच्या मनात बदल होऊ लागला. गावात एकमेकांना मदत करण्याची भावना वाढली. प्रेम, दया आणि बंधुभाव यांची नवी पहाट गावात उगवू लागली. काही वर्षांनी श्यामने गरीब मुलांसाठी गावात एक छोटी शाळा सुरू केली. तिथे तो मोफत शिक्षण देत असे. त्याचा विश्वास होता की शिक्षण हीच अशी शक्ती आहे जी माणसाचे भविष्य बदलू शकते. तो मुलांना फक्त पुस्तकांचे ज्ञान देत नव्हता, तर त्यांना प्रामाणिकपणा, माणुसकी आणि दयाळूपणाचे धडेही शिकवत होता. मुलांसाठी तो केवळ शिक्षक नव्हता, तर जीवनाचा खरा मार्गदर्शक बनला होता. गावातील वृद्ध लोक अनेकदा म्हणत, ''श्यामने सिद्ध केले की महान होण्यासाठी पैसा नाही, तर मोठे हृदय लागते.''

एक संध्याकाळी श्याम नदीच्या काठी एकटाच बसून मावळता सूर्य पाहत होता. त्याच्या चेहऱ्यावर एक अद्भुत शांतता आणि समाधान होते. त्याने आयुष्यात खूप संघर्ष पाहिले होते, अपमान सहन केला होता, गरीबीशी झुंज दिली होती, पण त्याने कधीही सत्याचा आणि चांगुलपणाचा मार्ग सोडला नव्हता. त्या क्षणी त्याला जाणवले की जीवनातील खरे सुख दुसऱ्यांच्या आनंदात आणि सेवेतच दडलेले असते. तो हलकेच हसला आणि म्हणाला, ''जर माणसाचे मन स्वच्छ असेल आणि कर्म चांगले असतील, तर देव स्वतः त्याच्या जीवनाला सन्मानाने भरून टाकतो.'' या कथेतून आपल्याला एक महान शिकवण मिळते जीवनात कितीही अडचणी आल्या तरी सत्य, प्रामाणिकपणा आणि चांगले कर्म सोडू नयेत. लोक तुमचा सन्मान करतील किंवा नाही, पण तुमची अंतरात्मा सदैव तुम्हाला सन्मानित करत राहील. जगातील सर्वात मोठे सुख हेच असते की रात्री झोपताना मन शांत असावे आणि आपण कोणाचेही वाईट केले नाही, तर कोणाच्या तरी चेहऱ्यावर हसू आणले आहे, याचे समाधान असावे. कारण माणसाची खरी ओळख त्याच्या चांगल्या कर्मांत असते आणि हीच कर्मे त्याला अमर बनवतात।

श्री बिस्वा रंजन साहू, कुवैत
संस्थापक आणि अध्यक्ष, भारत सेवा दर्शन
अध्यक्ष, वर्ल्ड ओडिशा सोसायटी कुवैत चॅप्टर
आंतरराष्ट्रीय अध्यक्ष, इंटरनॅशनल ओडिया फाउंडेशन
अध्यक्ष, भारत प्रवासी परिषद ओडिशा विंग्स असोसिएशन ऑफ कुवैत
लेखक, वार्ताहर, आंतरराष्ट्रीय समाजसेवक रायटर्स फोरम ऑफ कुवैत ।

# नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मान्यवरांच्या हस्ते अनावरण

**मुंबई :** नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित होत आहे. या कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचे अनावरण सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कुंभमेळ्याच्या लोगोसाठी कुंभमेळा प्राधिकरणाच्यावतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सुमारे तीन हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धकांमधून तीन उत्कृष्ट स्पर्धकांचा यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक पटकावलेल्या पुणे येथील सुमित काटे यांना तीन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक पटकावलेल्या नोएडा येथील मयांक नायक यांना दोन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह आणि तृतीय क्रमांक पटकावलेल्या पंढरपूर येथील पीयुष पिंपळनेरकर यांचा एक लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह देऊन




सन्मानित करण्यात आले.

प्रसून जोशी, अश्विनी देशपांडे, मंदार राणे, वृषाली केकणे (देशमुख), बारिश दाते, विनय नारंग, डॉ. प्राजक्ता बास्ते, प्रफुल्ल सावंत, डॉ. दिनेश वैद्य, अँथनी लोपेझ आणि डॉ. किरण शिंदे यांसारख्या दिग्गज डिझाइन तज्ज्ञांच्या समितीने या प्रवेशिकांचे परिक्षण केले. सर्जनशीलता, नाविन्य, ब्रँड सुसंगतता आणि सादरीकरण या निकषांवर आधारित ही निवड करण्यात आली. या समितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी प्रास्ताविकाद्वारे कुंभमेळा आयोजन आणि लोगो स्पर्धेबाबत माहिती दिली.

यावेळी कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग मंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांच्यासह विविध आखाड्यांचे साधू, संत उपस्थित होते. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी यावेळी उपस्थित साधू संतांचे स्वागत केले.

**नाशिक – त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाविषयी**

- *हे बोधचिन्ह नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या पवित्र भूगोल आणि धार्मिक परंपरांवर आधारित आहे.*
- *भगवान शंकराचे त्रिशूळ: आध्यात्मिक उर्जेचे प्रतीक.*
- *त्र्यंबकेश्वर मंदिर: प्रादेशिक वारशाचे दर्शन घडवणारी मंदिराची प्रतिकृती.*
- *काळाराम मंदिराची कमान आणि गोदावरी नदी: गोदावरी नदीला शिवलिंगाच्या रूपात दर्शविण्यात आले असून, ते कुंभमेळ्यातील पवित्र स्नानाच्या परंपरेचे महत्त्व अधोरेखित करते.*

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, मायगव्ह आणि असोसिएशन ऑफ डिझाइनर्स ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या देशव्यापी डिझाइन स्पर्धेतून या बोधचिन्हाची निवड करण्यात आली. २० नोव्हेंबर ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत मायगव्ह प्लॅटफॉर्मवर पार पडलेल्या या स्पर्धेत ७० आंतरराष्ट्रीय स्पर्धकांसह एकूण ३,०६७ प्रवेशिका प्राप्त झाल्या होत्या.

सहभागाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य आघाडीवर राहिले, त्याखालोखाल दिल्ली आणि तामिळनाडूचा क्रमांक लागला. १८ ते २४ वयोगटातील तरुणांनी या स्पर्धेत सर्वाधिक सक्रिय सहभाग नोंदवला.

## संक्षिप्त...

### ....तो अॅट्रॉसिटीचा गुन्हा ठरणार नाही, सर्वोच्च न्यायालयाने महत्वाचा निर्णय



नवी दिल्ली : जातीय शिवीगाळ प्रकरणांमध्ये अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याची नेमकी मर्यादा काय आहे, यावर सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या एका निर्णयातून महत्त्वपूर्ण भाष्य केले आहे. कौटुंबिक वाद, घराच्या आत घडलेली घटना आणि त्यानंतर दाखल झालेला अॅट्रॉसिटीचा गुन्हा या पार्श्वभूमीवर न्यायालयाने काही महत्त्वाचे निकष स्पष्ट केले आहेत. न्यायमूर्ती प्रशांतकुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.एखाद्या खासगी घराच्या चार भिंतींच्या आत, इतर कोणीही उपस्थित नसताना झालेली कथित जातिवाचक शिवीगाळ किंवा अपमान हा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा मानला जाऊ शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निवाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

तो अॅट्रॉसिटीचा गुन्हा ठरणार नाही

न्यायालयाने स्पष्ट केले की, अॅट्रॉसिटी कायद्याच्या कलम ३(१)(र) आणि ३(१)(स) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यासाठी जातिवाचक अपमान किंवा शिवीगाळ ही लोकांच्या नजरेसमोर'' घडलेली असणे आवश्यक आहे. न्यायालयाच्या मते, जर एखादी घटना सार्वजनिक ठिकाणी घडली असेल आणि उपस्थित लोक आरोपीने वापरलेले अपमानास्पद शब्द प्रत्यक्ष ऐकू किंवा पाहू शकत असतील, तरच त्या घटनेला कायद्याअंतर्गत गुन्हा मानले जाऊ शकते.

मात्र, जर कथित घटना एखाद्या खासगी घराच्या आत घडली आणि त्या ठिकाणी अन्य कोणीही उपस्थित नसेल, तर ती घटना ''लोकांच्या नजरेसमोर'' घडली असे मानता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले. खासगी जागाही काही परिस्थितीत सार्वजनिक मानली जाऊ शकते. सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात आणखी एक महत्त्वाचे स्पष्टीकरण दिले. एखादी घटना खासगी ठिकाणी घडली असली, तरी ती इतर लोकांना प्रत्यक्ष दिसू किंवा ऐकू येत असेल, तर त्या ठिकाणाला ''लोकांच्या नजरेसमोर'' असल्याचे मानले जाऊ शकते. यामुळे प्रत्येक प्रकरणातील परिस्थितीनुसार न्यायालयाला तथ्यांची तपासणी करावी लागेल, असेही स्पष्ट झाले आहे.

### बांगलादेशकडून पाकिस्तानचा सलग तिसऱ्यांदा कसोटीत पराभव; लाजिरवाण्या विक्रमाची नोंद

ढाका : पाकिस्तानला बांगलादेशकडून पुन्हा एकदा पराभवाला सामोरं जावं लागलं आहे. शान मसूदच्या नेतृत्वाखाली, पाकिस्ताननं मंगळवारी (१२ मे) आपल्या इतिहासात प्रथमच बांगलादेशमध्ये कसोटी सामना गमावला. ढाका इथं झालेल्या पहिल्या कसोटीत बांगलादेशनं पाकिस्तानला १०४ धावांनी पराभूत केलं. २६८ धावांचं लक्ष्य गाठताना पाकिस्तानची फलंदाजी कोसळली आणि ते केवळ १६८ धावांवरच गारद झाले. या विजयासह, बांगलादेशनं दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. हा पराभव पाकिस्तानसाठी एक लाजिरवाणा विक्रम ठरला आहे. बांग्लादेशविरुद्ध पाकिस्तानचा हा सलग तिसरा कसोटी पराभव आहे. यापूर्वी, २०२४ मध्ये बांगलादेशनं पाकिस्तानला २-० नं पराभूत केलं होतं. यासह झिम्बाब्वेनंतर बांगलादेशकडून सलग तीन कसोटी सामने गमावणारा पाकिस्तान हा दुसरा संघ ठरला आहे.

विशेष म्हणजे, २०२४ पूर्वी बांगलादेशने पाकिस्तानला कधीही कसोटी सामन्यात पराभूत केले नव्हते. मात्र, आता या संघानं पाकिस्तानला सलग तीन सामन्यांमध्ये पराभूत करुन क्रिकेट जगताला धक्का दिला आहे. ही बाबही उल्लेखनीय होती की बांगलादेशच्या भूमीवर पाकिस्तानचा हा पहिला कसोटी पराभव होता. यापूर्वी, पाकिस्ताननं तिथं खेळल्या गेलेल्या आठ कसोटींपैकी सात जिंकल्या होत्या, तर एक सामना अनिर्णित राहिला होता. या पराभवानंतर, पाकिस्तानला आपल्याच देशात मोठ्या प्रमाणावर टीकेला सामोरं जावं लागलं आहे.

शान मसूदच्या कर्णधारपदावर प्रश्नचिन्ह : या पराभवामुळं शान मसूदच्या कर्णधारपदावर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. २०२३ मध्ये कर्णधार झाल्यापासून, त्याला १५ कसोटी सामन्यांमध्ये ११ पराभवांना सामोरं जावं लागलं आहे. पाकिस्तानचा कसोटी कर्णधार म्हणून हा संयुक्तपणे दुसरा सर्वाधिक पराभवांचा आकडा आहे. त्यानं आता इंझमाम-उल-हकची बरोबरी केली आहे, ज्याला ३१ कसोटी सामन्यांमध्ये ११ पराभव पत्करावे लागले होते. सर्वाधिक पराभवांचा विक्रम अजूनही मिस्बाह-उल-हकच्या नावावर आहे, ज्याच्या कर्णधारपदाखाली पाकिस्ताननं १९ कसोटी सामने गमावले होते. परदेशातील मसूदची कामगिरी तर त्याहूनही वाईट आहे. त्याच्या कर्णधारपदाखाली, पाकिस्ताननं आतापर्यंत खेळलेले सर्व सहा परदेशी कसोटी सामने गमावले आहेत. त्यांचे चारही विजय मायदेशात, इंग्लंड, वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मिळाले आहेत.

सामन्यात काय झालं : सामन्याबद्दल बोलायचं झाल्यास, सामन्याच्या तिसऱ्या आणि चौथ्या दिवशी पावसामुळं खेळावर लक्षणीय परिणाम झाला. प्रथम फलंदाजी करताना, नाझमुल होसेन शांतोच्या शानदार १०१ धावांच्या जोरावर बांगलादेशनं पहिल्या डावात ४१३ धावा केल्या. प्रत्युत्तरात, पाकिस्तानचा संघ ३८६ धावांवर सर्वबाद झाला. दुसऱ्या डावात, बांगलादेशनं २४०/९ धावा करुन पाकिस्तानसमोर विजयासाठी ३६७ धावांचं लक्ष्य ठेवलं. मात्र लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानची फलंदाजी पूर्णपणे कोसळली आणि ते केवळ १६३ धावाच करु शकले, आणि बांगलादेशनं १०४ धावांनी सामना जिंकला. शेवटच्या सत्रात पाकिस्तानच्या ७ विकेट पडल्या. वेगवान गोलंदाज नाहिद राणानं पाच बळी घेत पाकिस्तानच्या फलंदाजीला उद्ध्वस्त केलं आणि

# श्रामनेर बौद्धाचार्य धम्म प्रशिक्षण शिबिरास सढळ हस्ते धम्मदान करा

**नवी मुंबई / के. एच. हनवते :** तथा भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हाअंतर्गत ''श्रामनेर - बौद्धाचार्य धम्म प्रशिक्षण शिबिर पंचशील बुद्ध विहार - भैय्यासाहेब आंबेडकर भवन तुर्भे नवी मुंबई येथे आदरणीय : प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिन ''स्वाभिमानी संकल्प डे चे अवचिते साधून दिनांक १० मे २०२६ रोजी श्रामनेर-बौद्धाचार्य धम्म प्रशिक्षण शिबिर प्रारंभ झाले असून सदर शिबिर १९ मे २०२६ पर्यंत संघनायक : पूज्य भंते संघपालजी महाथेरो, पूज्य भंते धम्मपाल जी महाथेरो तसेच भंते : कौंडीने (पूर्वाश्रमीचे प्रकाश माने) यांच्या नेतृत्वाखाली होत आहे सदर कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक : अशोक केदारे गुरुजी ( केंद्रीय कार्यालयीन सचिव महाराष्ट्र राज्य ) यांची प्रमुख उपस्थिती लाभली मान. अशोक केदारे गुरुजी यांच्या शुभ हस्ते दैनिक महावृत्त पत्रकार - बौद्धाचार्य कल्याणराव हनवते यांचा जाहीर सत्कार करण्यात



आला. सदर कार्यक्रमास विजय कांबळे गुरुजी (उपाध्यक्ष संस्कार महाराष्ट्र राज्य) हे उपस्थित होते, या शिबिरास ज्यांना कुणाला फळ अहार / भोजनदान करायचे आहे त्यांनी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : विजय झनके गुरुजी आणि संजय झणके गुरुजी यांना संपर्क करून आजच आपली तारीख सुनिश्चित करा... कल्याणराव हनवते (बौद्धाचार्य) ९९६७७१६४४३

# शिवसेनेच्या वतीने गाव तेथे शाखा व घर तेथे शिवसैनिक अभियान राबविणार: तालुकाप्रमुख बाबुराव शेळके



**लातूर/प्रतिनिधी :** आगामी काळात शहर विधानसभा मतदारसंघात गाव तेथे शाखा व घर तेथे शिवसैनिक हे अभियान लातूर शहर मतदारसंघात राबविण्यात येणार असून लातूर शहर मतदार संघात शिवसेनेची बांधणी भक्कमपणे करून येथे सेनेला चांगले दिवस आणून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू असे प्रतिपादन शिवसेना तालुकाप्रमुख बाबुराव शेळके यांनी लातूर येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना केले.

यावेळी शिवसेनेची बुलंद तोफ सोमनाथ स्वामी डिगोळकर, लातूर शहरप्रमुख मोहन दिवटे, शिवसेना पदाधिकारी संतोष पाटील, बाळासाहेब दंडिमे आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना शेळके म्हणाले की,येणाऱ्या काळामध्ये शिवसेनेची पाळामुळे घराघरापर्यंत पोहोचले पाहिजेत आणि शिवसेना मोठ्या प्रमाणात वाढली पाहिजे यासाठी जीवांचे रान करून शिवसेनेचा भगवा झेंडा आगामी काळात लातूर शहर महापालिका व लातूर शहर विधानसभेत फडकावण्याचा मानस असून त्यासाठी गावागावात शिवसेनेची शाखा व शहरातील प्रभागांमध्ये शिवसेना शाखेचे बांधणी करून येणाऱ्या काळामध्ये शिवसेनेच्या पन्नास शाखा शिवसेना शहर मतदार संघामध्ये स्थापना करण्यासाठी प्रयत्न करणार असून पन्नासाव्या शाखेच्या उद्घाटनासाठी शिवसेनेचे लोकप्रिय खासदार युवा नेते डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांना आणण्याचा आम्ही प्रयत्नशील राहू.

यावेळी प्रास्ताविकात सोमनाथ स्वामी डिगोळकर यांनी शिवसेनेचे मुख्य नेते पक्षप्रमुख व राज्याचे कर्तबगार उपमुख्यमंत्री मा ना एकनाथराव शिंदे साहेब यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात केलेल्या जनकल्याणकारी योजनेची माहिती देवून सामान्य माणसाच्या हितासाठी भरीव असे कार्य झाल्याचे सांगुन, पक्ष वाढीसाठी आगामी काळात मोठ्या गतीने प्रयत्न केले जाणार असल्याचे नमुद केले.तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी लातूर शहरात प्रभावीपणे कार्य करू यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत अशी माहिती मोहन दिवटे यांनी यावेळी पत्रकारांना दिली. या पत्रकार परिषदेस मोठ्या संख्येने पत्रकार बांधव उपस्थित होते.

### सपा प्रमुख अखिलेश यादव यांचे धाकटे बंधू प्रतीक यादव यांचे निधन

लखनऊ : समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांचे भाऊ आणि भाजपा नेत्या अपर्णा यादव यांचे पती प्रतीक यादव यांचं निधन झालं आहे. ते ३८ वर्षांचे होते. मिळालेल्या माहितीनुसार, त्यांना आज बुधवारी (१३ मे) सकाळी ६ वाजता विक्रमादित्य येथील त्यांच्या निवासस्थानातून लखनऊच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नेण्यात आलं. मात्र तिथं डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. श्यामा प्रसाद मुखर्जी रुग्णालयाचे सीएमएस डॉ. देवेश चंद्रा यांनी सांगितलं की, त्यांना रुग्णालयात आणलं तेव्हा त्यांचा आधीच मृत्यू झाला होता. प्रतीक यादव यांचा मृतदेह खउशळ मध्ये पोस्टमॉर्टमसाठी पाठवण्यात आला आहे.समाजवादी पार्टीनं शोक व्यक्त : त्यांच्या निधनावर समाजवादी पक्षानं शोक व्यक्त केला आहे. पक्षानं 'एक्स' वर पोस्ट करत लिहिलं आहे की, ''अत्यंत दु:खद! ईश्वर दिवंगत आत्म्यास शांती देवो.''प्रतीक हे मुलायम सिंह यादव यांच्या दुसऱ्या पत्नी साधना गुप्ता यांचे पुत्र होते. त्यांनी ब्रिटनमधील युनिव्हर्सिटी ऑफ लीड्समधून शिक्षण घेतलं होतं. देशातील सर्वात मोठ्या राजकीय कुटुंबाशी संबंधित असूनही ते राजकारणापासून दूर राहिले. त्यांचा रिअल इस्टेट आणि फिटनेसचा व्यवसाय होता.प्रतीक लखनऊमध्ये 'द फिटनेस प्लॅनेट' नावाचे जिम चालवत होते. ते 'जीव आश्रय' नावाची एक संस्था देखील चालवत होते. या संस्थेमार्फत रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांचे उपचार, देखभाल, अन्नपुरवठा आणि बचावकार्य केलं जात असे.

# बाबासाहेब साळे यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गुण गौरव व त्यांना आर्थिक मदत

**नवी मुंबई / के. एच हनवते :-** (जुईनगर) बहुजन समाज पार्टी चे सक्रिय व जेष्ठ कार्यकर्ते आयु. बाबासाहेब साळे (जुईनगर) यांनी आपल्या स्व:तच्या संकल्पनेतून तथागत भगवान गौत्तम बुद्ध यांची दान पारमिता अंगीकारून ज्या विद्यार्थ्यांनी ४ थी, ७ वी, १० वी आणि १२ वी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले व चांगले मार्क्स घेऊन पास झालेल्या मुलांचे व ज्यांचे पालक हे रोजंदारीवर काम करतात व स्वत:चे त्यांना कसलेही घर नाही अशा विद्यार्थ्यांचा व पालकांचा गुण गौरव करून त्यांना आपण थोडीफार आर्थिक मदत केलीच पाहिजे या स्वच्छ व उदात्त निर्मळ भावनेतून छोटे खाणी महालक्ष्मी सोसायटी जुईनगर नवी मुंबई येथे कार्यक्रम आयोजित केला होता, बाबासाहेब साळे हे आपल्या विभागात सतत छोट्या मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करत असतात त्यांच्या कार्यक्रमात कसलाही स्टेज शो किंवा गाजावाजासाठी व्यर्थ खर्च न करता तोच





पैसा बचत करून गरीब वंचित समूहाला कशी मदत करता येईल आणि आपण पण समाजाचे काहीतरी देणे लागतो जसे की, ''डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे की ''आपल्या उत्पन्नातील २० वा भाग समाजकार्यासाठी दान करा..! आणि त्याच प्रमाणे बाबासाहेब साळे हे समाजसेवा आणि धम्माचा प्रचार आणि प्रसार करत आहेत सदर कार्यक्रमात सर्वप्रथम आपले आदर्श तथागत भगवान गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्प वाहून बौद्धाचार्य : पोपट वाघमारे यांनी आपल्या आदर्शांची पुष्प पूजा व त्रिसरण पंचशील घेवून कार्यक्रमाचे सुरवात केली, त्यावेळी बौद्धाचार्य- दैनिक महावृत्त पत्रकार : कल्याणराव हनवते, समाजसेवीका : दया झेंडे (नेरूळ जयंती उत्सव समिती सल्लागार), तसेच ( बसपा) बेलापूर विधानसभा अध्यक्ष : विनोद धुरंधर आणि रवि साळुंखे रिटायर जुईनगर ऊपस्थित होते. महादेव वाघमारे, जमिर शेख, प्रवीण लोखंडे, पालक व विद्यार्थी यांचा सत्कार युगपुरुषांची फोटो प्रतिमा व आर्थिक मदत म्हणून बंद पाकीट देऊन सन्मानित केले त्यांची नावे खालील प्रमाणे १) विनोद धुरंधर, २) शालन ३)तनवी, ४)श्रावणी ५) विश्व रत्न, ६) यशपाल धारा वाल्मिकी, ७) आशा यशपाल, ८) प्रियांका यशपाल ९) दिपा यशपाल, १०) मुकेश कुवरसिंग वाल्मिकी, ११)मीना मुकेश कुवरसिंग, १२) कदम, घाडगे, ईत्यादिना मदत केली कार्यक्रमास मारूती सरवदे, बद्रिके ऊपस्थित होते या कार्यक्रमात प्रबोधनपर गीत गायन आयु. शांताबाई धुरंदर यांनी दोन गीते गायली, बाबासाहेब साळे, पोपट वाघमारे, रवि साळुंखे यांनी दोन गीत गाऊन मनोरंजन केले व शेवटी सरणतय घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# लातूर जिल्ह्यातील व उदगीर- जळकोट मतदारसंघातील नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या

## ■ माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांची मागणी
## ■ मंत्रालयातील बैठकीत शेतक-यांना जास्तीत जास्त नुकसान भरपाईची देण्याची मागणी

**उदगीर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील व उदगीर-जळकोट मतदारसंघातील नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर आज मंत्रालयात राज्याचे कृषिमंत्री दत्ता मामा भरणे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसान, जमीन खरडून झालेली हानी तसेच शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी माजी मंत्री संजय बनसोडे यांनी लातूर जिल्ह्यातील व उदगीर-जळकोट मतदारसंघातील शेतकरी मोठ्या संकटात सापडले असून त्यांना तातडीने व जास्तीत जास्त मदत मिळावी यासाठी राज्य शासनाकडे ठोस मागणी करण्यात आल्याचे सांगितले. तसेच माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनीही शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. बैठकीत मांडण्यात आलेल्या माहितीनुसार, गतवर्षी खरीप २०२५ च्या हंगामात उदगीर-जळकोट मतदारसंघातील जवळपास ८५ ते ९० टक्के पीक क्षेत्र नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झाले आहे. उदगीर तालुक्यात ६१ हजार ८४५ हेक्टर तर जळकोट तालुक्यात ३० हजार ८६७ हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणी झाली होती. एकूण ९२ हजार ७१२ हेक्टर क्षेत्रापैकी तब्बल ७७ हजार ८६५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून सुमारे ६८९८.३६ लाख रुपयांच्या नुकसान भरपाईचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना पीक विमा व नुकसान भरपाई तातडीने मिळावी यासाठी बैठकीत विविध महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या. एनडीआरएफ पंचनाम्यांची माहिती ग्राह्य धरून सर्व पीक विमाधारक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त विमा मंजूर करावा, अतिवृष्टीमुळे पिकांच्या गुणवत्तेत झालेल्या घटीचाही विमा योजनेत समावेश करावा तसेच ई-पीक पाहणीतील तांत्रिक त्रुटी दूर करण्यासाठी तातडीची दुरुस्ती व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या. याशिवाय गाव पातळीवर पंचनामे करण्याची व्यवस्था, पीक कापणी प्रयोगांची संख्या वाढवणे, विमा कंपन्यांवर कडक नियंत्रण ठेवणे, शेतकऱ्यांना व्याजासह भरपाई देण्याची तरतूद करणे तसेच अल्पभूधारक शेतकऱ्यांचा विमा हप्ता शासनाने उचलावा, अशा विविध मागण्या शासनाकडे करण्यात आल्या.

माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांनी, लातूर जिल्ह्यातील व उदगीर-जळकोट मतदारसंघातील शेतकरी नैसर्गिक संकटामुळे मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शासनाने शेतकऱ्यांना न्याय देवुन तातडीने आणि जास्तीत जास्त नुकसान भरपाई द्यावी अशी भूमिका त्यांनी मांडली, शेतकऱ्यांच्या हितासाठी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करण्याची मागणी ही आ.बनसोडे यांनी केली आहे. विमा कंपनीने जिल्हास्तर व राज्यस्तरावर अपिल केले होते ते दोन्ही स्तरावर फेटाळण्यात आले आहेत. त्याप्रमाणे विमा कंपनीने मान्यता दिली असुन आता विमा कंपनी विमा भरपाई देण्याची



कार्यवाही तातडीने करणार असल्याचे विमा कंपनीचे प्रतिनिधी चंदन जगताप यांनी बैठकीत सांगितले. माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांनी विमा प्रतिनिधी यांना लातूर जिल्ह्यातील व उदगीर जळकोट मतदारसंघातील तसेच जिल्ह्यातील सर्व विमाधारक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त विमा देण्याची कार्यवाही करण्याची सूचना केली. या बैठकीस कृषि सचिव परिमल सिंह, कृषि आयुक्त सुरज मांढरे, लातूर जि.प. चे बांधकाम सभापती ज्ञानेश्वर बिरादार, जि.प. सदस्य डॉ. दीपक सोमवंशी, रामराव राठोड, प्रकाश राठोड, उदगिरचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष बालाजी भोसले, लातूर जिल्हा कृषी अधिकारी राजेंद्र कदम इत्यादी उपस्थित होते.

# प्रमोद उबाळे लातूर यांना विश्व समता राज्यस्तरीय साहित्यरत्न पुरस्कार

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील कवी लेखक सम्राट अशोक साहित्य व सांस्कृतिक मंच चे संथापक आध्यक्ष प्रमोद धर्मराज उबाळे लातूर यांना विश्व् समता कला मंच लोवले ता.संगमेश्वर जि. रत्नागिरी



या संस्थेच्या वतीने आपल्या सामाजिक,साहित्यिक,संस्कृतिक,धार्मिक ,कला,क्रीडा,सहकार,पर्यावरण व जलसंवर्धन क्षेत्रात आपण केलेले उल्लेखनीय,प्रेरणादायी व समाजभान जपणारे कार्य केवळ कर्तव्यपूर्ती न राहता नव्या पिढीसाठी दिशादर्शक ठरले आहे.आपल्या कार्यातून संस्कारांची जपणूक,ज्ञानाचा प्रचार,संस्कृतीचे संवर्धन, कलेचा विकास,क्रीडा वृत्तीचे संवर्धन,निसर्ग व जलसंत्तीचे संरक्षण आणि सत्यनिष्ठ मूल्यांची प्रखर मांडणी समाजास लाभली आहे. या सर्व क्षेत्राती आपल्या अतुलनीय योगदानाची दाखल घेत आपणास राज्यस्तरीय विश्व् समता साहित्यरत्न पुरस्कार मानपत्र, सन्मानचिन्ह व मानाचा पट्टा देऊन आपला सन्मान करीत आहोत यावेळी संस्थेचे अध्यक्ष मनोज जाधव सर,सहसचिव संदीप जाधव,मार्गदर्शक दिपक पवार,युयुल्सू आर्ले,संघटक आंब्रे हे सर्व मान्यवर उपस्थित होते.

# भैरवनाथ माध्यमिक विद्यालयात एसएससी परीक्षेतील गुणवंतांचा सत्कार ; ९० % निकाल



**लातूर/प्रतिनिधी :** वसवाडी येथील भैरवनाथ माध्यमिक विद्यालयात इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोमवार, दिनांक ११ मे २०२६ रोजी सोहळा संपन्न झाला. या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्रशासकीय अधिकारी गोविंद माने, प्रमुख पाहुणे म्हणून साने गुरुजी शैक्षणिक संकुलाचे सचिव कालिदास माने, संकुलाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज माने, विलासराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य विवेक माने, प्रशासकीय अधिकारी नागोराव कांबळे व उषा आडे, ज्ञानदेवराव माने ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य शरद चव्हाण, आयआयटी फाउंडेशनच्या प्राचार्या उषा देशमुख, मुख्याध्यापक सिद्धेश्वर जाधव आदी उपस्थित होते.या सत्कार सोहळ्यात विद्यालयातून सर्व प्रथम माळी सृष्टी नवनाथ, द्वितीय उबाळे प्रज्ञा कमलाकर व तृतीय आलेल्या खुडे अनुष्का संतोष यांचा उपस्थितांच्या हस्ते सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. सोबत शिंदे वैष्णवी भिमाशंकर, इटकर नागेश दत्ता, . जाधव श्रद्धा हरिभाऊ, सहजराव इशानी दत्ता,इडेकर अंकिता अशोक, भडंगे ऋतुजा नवनाथ आदी गुणवंत विद्यार्थ्यांचा सुद्धा संस्थेचे सचिव मा. कालिदासराव माने सर यांच्या शुभ हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहशिक्षक ढाले ए.जी., सुर्यवंशी एस. बी. प्रा. पंचशिला कांबळे, सेवक पांचाळ सुर्यकांत आदींनी मेहनत घेतली. कार्याक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. कल्याण पवार यांनी केले तर आभार उषा देशमुख यांनी मानले. या यशाबद्दल साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक इस्माईल शेख, नंदादीप माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीनिवास राऊत, साने गुरुजी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पांडुरंग केंद्रे, सुभाष चंद्र बोस प्राथमिक विद्यालय मुख्याध्यापक भागवत सगरे, अक्षनंद प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्मिता भोसले, नंदादीप प्राथमिक विद्यालयाच्या प्रभारी मुख्याध्यापिका सुवर्णा जोशी, भैरवनाथ प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक कमलाकर जाधव आदींनी अभिनंदन केले आहे.

# लुडो गेम खेळले अनब... मामाने झोपलेल्या भाच्यावर चाकूचे सपासप वार केले

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण शहर परिसरातील उंबर्डे-कोळवली आणि दुर्गा चौक परिसरात एका थरारक आणि माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटनेने संपूर्ण शहर हादरले आहे. मोबाईलवरील किंवा बोर्डवरील 'लुडो' सारख्या एका साध्या खेळातील हार-जितीच्या वादाचे रुपांतर चक्क एका निर्घृण हत्येत झाले आहे. एका अल्पवयीन मामाने रक्ताच्या नात्याला विसरून आपल्याच सख्ख्या भाच्याची अत्यंत निर्दयीपणे हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या अंगावर काटा आणणाऱ्या घटनेमुळे संपूर्ण परिसरात सध्या भीतीचे आणि हळहळीचे वातावरण पसरले असून, खडकपाडा पोलीस या गंभीर प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार, या भीषण हत्याकांडाची सुरुवात अत्यंत साध्या आणि दैनंदिन वाटणाऱ्या एका घटनेतून झाली. रात्रीच्या वेळी आरोपी असलेला अल्पवयीन मामा आणि त्याचा मयत भाचा हे दोघेही घराजवळ बसून फावल्या वेळात 'लुडो' खेळत होते. खेळाच्या दरम्यान कोणाची तरी हार झाल्याने किंवा नियमांवरून दोघांमध्ये शाब्दिक चकमक उडाली. सुरुवातीला हा निव्वळ घरातील दोन मुलांमधील नेहमीचा किरकोळ वाद वाटला होता. मात्र, काही क्षणांतच दोघांच्या रागाचा पारा चढला आणि या क्षुल्लक भांडणाने एका भयानक व हिंसक वळणाची दिशा पकडली. हा वाद मृत्यूला आमंत्रण देईल, याची पुसटशीही कल्पना तेव्हा कोणालाच आली नव्हती.खेळातील त्या वादानंतर भाचा सर्व काही विसरून घरात गाढ झोपण्यासाठी गेला. परंतु, दुसरीकडे अल्पवयीन मामाच्या डोक्यात अपमानाची आणि रागाची आग धुमसतच होती. सूडाच्या भावनेने पेटून उठलेल्या या अल्पवयीन मामाने घरातील स्वयंपाकघरातून एक धारदार चाकू हातात घेतला. रात्रीची शांतता पसरलेली असताना व सगळे झोपेत असताना त्याने गाढ झोपेत असलेल्या निष्पाप भाच्यावर अत्यंत क्रूरपणे हल्ला चढवला. त्याच्या डोक्यावर राग इतका स्वार झाला होता की त्याने केवळ एक-दोनदा नव्हे, तर तब्बल दहा ते बारा वेळा चाकूचे सपासप वार भाच्याच्या अंगावर केले. रक्ताच्या थारोळ्यात पडल्याने गंभीर जखमी झालेल्या भाच्याचा अत्यंत दुर्दैवी मृत्यू झाला.

# डिजिटल स्वाक्षरीयुक्त सातबारा उतारा आता घरबसल्या उपलब्ध

## नागरिकांनी एजंटांपासून सावध राहण्याचे लातूर जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या जमिनीचे महसुली अभिलेख सुलभ, पारदर्शक आणि अत्यंत जलद गतीने उपलब्ध व्हावेत, यासाठी महसूल विभागातर्फे 'डिजिटल सातबारा' ही विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अलीकडच्या काळात सातबारा उतारा मिळवण्यासाठी काही मध्यस्थ किंवा एजंट नागरिकांकडून अवाजवी पैसे उकळत असल्याच्या तक्रारी आणि बातम्या समोर येत आहेत. मात्र, नागरिकांना डिजिटल स्वाक्षरीयुक्त सातबारा उतारा प्राप्त करण्याची प्रक्रिया अत्यंत सोपी आणि माफक दरात उपलब्ध असून नागरिकांनी कोणत्याही एजंटांच्या प्रलोभनांना बळी पडू नये, असे आवाहन लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

भूमी अभिलेख विभागाच्या https://bhulekh.mahabhumi.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर नागरिकांना स्वतःच्या जमिनीची माहिती पाहायची अथवा नोंदी तपासण्याची सुविधा पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध आहे. या पोर्टलवर नागरिक आपला जिल्हा, तालुका आणि गाव निवडून सातबारा, आठ-अ आणि मालमत्ता पत्रक कोणत्याही शुल्काशिवाय पाहू शकतात, मात्र ही प्रत केवळ माहितीसाठी असून ती कायदेशीर कामासाठी वापरता येत नाही.

कायदेशीर कामासाठी आवश्यक असलेला डिजिटल स्वाक्षरीयुक्त सातबारा उतारा मिळवण्यासाठी नागरिकांनी महसूल विभागाच्या https://digitalsatbara.mahabhumi.gov.in/dslr या संकेतस्थळाचा वापर करावा. या सुविधेसाठी शासनाने केवळ १५ रुपये इतके माफक शुल्क निश्र्चित केले आहे आणि विशेष म्हणजे उताऱ्याची पाने कितीही असली तरी हे शुल्क कायम राहते. या डिजिटल उताऱ्यास कोणत्याही सरकारी कार्यालयात, बँकेत किंवा न्यायालयीन कामकाजासाठी स्वतंत्र शिक्का किंवा तलाठ्यांच्या स्वाक्षरीची गरज लागत नाही, ज्यामुळे नागरिकांचा वेळ आणि श्रमाची मोठी बचत होत आहे.

डिजिटल उतारा प्राप्त करण्यासाठी नागरिकांनी प्रथम पोर्टलवर जाऊन 'न्यूज युझर रजिस्ट्रेशन' (New User Registration) द्वारे स्वतःची नोंदणी करून लॉगिन आयडी तयार करावा. त्यानंतर लॉगिन करून आपल्या जमिनीचा गट क्रमांक किंवा सर्व्हे नंबर प्रविष्ट करावा आणि यूपीआय (UPI), नेट बँकिंग किंवा डेबिट कार्डच्या माध्यमातून १५ रुपयांचा भरणा करावा. व्यवहार यशस्वी झाल्यानंतर डिजिटल स्वाक्षरीयुक्त उतारा पीडीएफ (PDF) स्वरूपात डाउनलोड करता येईल.

लातूर जिल्हा प्रशासनाने सर्व तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांना नागरिकांना या प्रक्रियेत योग्य मार्गदर्शन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. जर कोणत्याही व्यक्तीकडून या कामासाठी जादा पैसे मागितले जात असतील किंवा नागरिकांची फसवणूक होत असेल, तर त्यांनी तात्काळ लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ०२३८२-२२०२०० या दूरध्वनी क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# शिंदे गटाचे नऊ नगरसेवक ठाकरे गटाच्या रडारवर

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाणे महानगरपालिका निवडणुकीनंतर आता दिव्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. निवडणूक प्रतिज्ञापत्रात मालमत्ता आणि आर्थिक तपशिलाबाबत चुकीची तसेच दिशाभूल करणारी माहिती दिल्याचा आरोप करत ठाकरे गटाने शिंदे गटाच्या नऊ नगरसेवकांविरोधात ठाणे न्यायालयात धाव घेतली आहे. या याचिकांमुळे संबंधित नगरसेवकांची पदे धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ मध्ये दिवा परिसरातून शिंदे गटाचे अनेक नगरसेवक निवडून आले आहेत. मात्र, यापैकी नऊ नगरसेवकांनी आपल्या निवडणूक शपथपत्रात मालमत्ता, अनधिकृत बांधकामे आणि आर्थिक व्यवहारांची पूर्ण माहिती दिलेली नाही, असा दावा ठाकरे गटाचे पदाधिकारी ॲड. रोहिदास मुंडे यांनी केला आहे.

# मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी लातूरमध्ये 'एसआयआर' मॅपिंग मोहीम सुरू

**लातूर/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मतदार याद्यांचे सखोल पुनरीक्षण (एसआयआर) आणि मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी लातूर जिल्ह्यात विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. सन २००२ च्या मतदार यादीशी सध्याच्या मतदारांचे मॅपिंग (पडताळणी) करणे या मोहिमेचा मुख्य उद्देश असून, ही प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या मतदारांना भविष्यात सुनावणीच्या क्लिष्ट प्रक्रियेला सामोरे जावे लागू शकते, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम ११ मे २०२६ ते २५ मे २०२६ या कालावधीत राबवली जात आहे. यासाठी सर्व मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) आणि पर्यवेक्षक यांची नियुक्ती करण्यात आली असून, ते दररोज सायंकाळी ५ ते ७ या वेळेत मतदान केंद्रांवर उपलब्ध राहतील. तसेच इतर वेळी ते मतदारांच्या घरोघरी जाऊन माहिती संकलित करतील. मतदारांनी सन २००२ च्या मतदार यादीतील माहितीनुसार २००२ मधील मतदार संघाचे नाव, मतदार यादी भाग क्रमांक, यादीतील अनुक्रमांक या तीन प्रमुख बाबींची पडताळणी करणे आवश्यक आहे. ज्या मतदारांची नावे २००२ च्या यादीत नाहीत, त्यांची पडताळणी त्यांच्या आई-वडील किंवा आजी-आजोबांच्या नावाच्या आधारे केली जाणार आहे.

लातूरच्या उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी २३५-लातूर शहर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पंचायत समिती सभागृहात आढावा बैठक पार पडली. ज्या भागात मॅपिंगचे काम ७० टक्क्यांहून कमी आहे, त्या ठिकाणच्या बीएलओ आणि स्वच्छता निरीक्षकांना कामकाज तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

भविष्यात सुनावणी आणि पुराव्यांच्या पडताळणीची किचकट प्रक्रिया टाळण्यासाठी मतदारांनी स्वतःहून आपले मतदार ओळखपत्र दाखवून बीएलओ मार्फत ही मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

# बारामती पुन्हा हादरलं! गोजुबाबीत शिकाऊ विमान कोसळलं; वैमानिक सुरक्षित

**बारामती /प्रतिनिधी :** बारामती तालुक्यात एक शिकाऊ विमान पडल्याची घटना समोर आली आहे. रेडबर्ड कंपनीचं दोन आसनी प्रशिक्षणार्थी विमान गोजुबाबी गावाच्या हद्दीत कोसळल्यानं परिसरात खळबळ उडाली. सुदैवानं या दुर्घटनेत शिकाऊ वैमानिक सुरक्षित असल्याची प्राथमिक माहिती मिळाली असून, मोठी जीवितहानी टळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हे विमान प्रशिक्षणासाठी उड्डाण करत असताना अचानक तांत्रिक बिघाडामुळे किंवा अन्य कारणामुळे नियंत्रण सुटल्यानं खाली कोसळलं असावं, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, अपघाताचं नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही.

विमानाचा आवाज येताच स्थानिक ग्रामस्थांनी मदतीसाठी धाव घेतली. प्राथमिक माहितीनुसार, पायलटनं प्रसंगावधान राखल्यामुळे त्याचे प्राण वाचले आहेत. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल झाले असून पंचनाम्याचे काम सुरू आहे.पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांनी दिलेल्या माहितीनुसार, आज सकाळी सुमारे ८:५० वाजता रेड बर्ड एव्हिएशनचे एक प्रशिक्षणार्थी विमान बारामती विमानतळालगत असलेल्या गोजुबाबी गावाजवळ क्रॅश लँड झालं. घटनास्थळी उपस्थित असलेल्या प्रत्यक्षदर्शींच्या प्राथमिक माहितीनुसार, कमी उंचीवर उड्डाण करत असताना या विमानात तांत्रिक बिघाड निर्माण झाला.

# लातूर तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीवर महसूल विभागाची कारवाई






**लातूर/प्रतिनिधी :** लातूर तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्यांवर महसूल विभागाने कारवाईचा बडगा उगारला आहे. मे महिन्यात राबविलेल्या विशेष मोहिमेत बेकायदेशीररीत्या वाळू, दगड आणि मुरूम यांची वाहतूक करणारी एकूण ४ वाहने जप्त करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे, अशी माहिती लातूरचे तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सौदागर तांदळे यांनी दिली आहे.

या मोहिमेदरम्यान एकूण ३ हायवा आणि १ टिप्पर या वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. यापैकी एच-२४ बीडब्ल्यू-७७७३ या हायवा वाहनातून ४ ब्रास वाळूची अवैध वाहतूक केली जात होती. याप्रकरणी संबंधिताकडून ३ लाख १५ हजार ६२० रुपये इतका दंड शासन खाती जमा करण्यात आला आहे. तसेच एमएच-४२ टी-०७७५ या हायवा वाहनातून ५ ब्रास मुरूम नेला जात असताना कारवाई करण्यात असून याप्रकरणी २ लाख २९ हजार ७७५ रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

एमएच-२२ एन-१२५१ या टिप्परवर ३ ब्रास दगडाच्या अवैध वाहतुकीसाठी कारवाई करण्यात आली असून, सध्या या दंडात्मक वसुलीची प्रक्रिया सुरू आहे. तसेच केए-२८ सी- ७३६७ या हायवा वाहनावर ४ ब्रास वाळूच्या वाहतुकीसाठी कारवाई करण्यात आली असून, या प्रकरणातील कायदेशीर कार्यवाही देखील प्रगतीपथावर आहे. यापुढेही तालुक्यातील अशा अवैध प्रकारांवर महसूल विभागामार्फत कारवाई केली जाणार आहे, असे तहसील कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.